Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# जालना कृषि विज्ञान केंद्राचा प्रशिक्षण कार्यक्रम – एक आढावा

**प्रा.डॉ.सीताराम उत्तमराव अनपट**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
सि.जे.पटेल महाविद्यालय, तिरोडा, जि. गोंदिया

**प्रस्तावना :–**

विकास प्रक्रीयेत कृषि क्षेत्राला महत्वाचे स्थान आहे. उल्बर्ट हर्शमन यांच्या मते, “विकास प्रक्रीयेला प्रभावित करणारा कृषिक्षेत्र महत्वाचा घटक आहे”. अर्थव्यवस्थेच्या वृध्दीदराचा देखील कृषिक्षेत्राच्या विकासाषी जवळचा संबंध असतो. निसर्गवाद्यांच्या मते, शेती हे आर्थिक वृध्दीचे इंजिन आहे. ॲडम स्मिथ, रिकार्डो आणि मालथस या जगप्रसिद्ध अर्थतज्ञांनी देखील आर्थिक विकासात कृषिक्षेत्राचे महत्व मान्य केलेले आहे. भारतीय कृषितज्ञ एम. एस. स्वामीनाथन यांच्या मते, “शेतीचा विकास गतिमान केला तरच सर्वसमानेशक आर्थिक विकासाचे उद्दीष्ट गाठता येते एकूणच आर्थिक विकासात कृषि क्षेत्राचे महत्व अनन्य साधारण आहे.

**कृषि विज्ञान केंद्राची संकल्पना :–**

तंत्रज्ञान मध्यस्थता कार्यक्रम हा भारतीय संशोधन परिषदेच्या विषय पत्रिकाचा एक भाग आहे. ज्या अंतर्गत शेतकऱ्यांना शिक्षण–प्रशिक्षण दिले जाते. याच पार्श्वभूमीवर कृषि संशोधन आणि कृषि तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी कृषि विज्ञान केंद्राची संकल्पना उदयास आली.

कृषि विज्ञान केंद्राची स्थापना खालील मूलभूत संकल्पनेवर आधारीत आहे.

1) प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष कार्यानुभवाद्वारे प्रशिक्षण देणे.

2) शेतकरी, कृषि विस्तार कार्यकर्ता व स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्या ग्रामीण युवक व युवती यांना प्रशिक्षण देणे.

3) प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम व कार्यक्रम विशिष्ट भागातील नैसर्गिक साधनसंपत्ती, स्थानिक गरजा आणि त्या परिसरात कृषि विकासाला असलेला वाव या बाबींचा विचार करून आखणे.

**संशोधन विषयाची निवड :–**

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषिक्षेत्र महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. भारतीय नियोजन कालखंडात कृषि विकासासाठी विविध व्यूहरचनांचा अवलंब करण्यात आला. परिणामतः कृषि विकासाला गती मिळाली. जागतिकीकरणामुळे भारतीय कृषिक्षेत्राला नवनवीन संधीची दारे खुली होत आहे. सोबतच काहि आव्हाने देखील उभी आहेत. परंतु जागतिकीकरणाच्या प्रवाहातून बाहेर पडणे शक्य नाही. त्यामुळे जागतिकीकरणाच्या या नव्या वातावरणात भारतीय कृषिक्षेत्रात संरचनात्मक

बदलाची आवश्यकता आहे. आज भारतीय शेतीची व शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती यांचा विचार करता, कृषि विकास अपेक्षित पातळीवर झालेला दिसून येत नाही. याच पार्श्वभूममीवर कृषिक्षेत्रात सखोल व विस्तृत अध्ययन व संशोधन करणे महत्वाचे आहे.

आज देशामध्ये प्रत्येक जिल्हयासाठी एक कृषि विज्ञान केंद्र कार्यरत आहे. परंतू जालना जिल्हयातील कृषि विज्ञान केंद्राची कृषि विकासांतील भूमिका तपासत असतांना कृषि विज्ञान केंद्राचा प्रशिक्षण कार्यक्रम महत्वाचा आहे. त्यामुळे या प्रशिक्षण कार्यक्रमातील शेतकऱ्यांचा सहभाग व त्या कार्यक्रमाचा शेतकऱ्यांवर झालेला परिणाम तपासण्यासाठी श्जालना कृषि विज्ञान केंद्राचा प्रशिक्षण कार्यक्रम एक आढावाश हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**संशोधनाची उद्दीष्टे :—**

1) शेतकरी कृषि विस्तार कार्यकर्ता व स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्या ग्रामीण युवक व युवती यांचा प्रशिक्षण कार्यक्रमातील सहभाग तपासणे.

2) कृषि विज्ञान केंद्रातर्गत प्रशिक्षण कार्यक्रमांचा शेतकऱ्यांवर झालेला परिणाम शोधणे.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत संशोधन दुय्यम आधार सामग्री (Secondary data) या आधार सामुग्रीवर आधारीत आहे. जालना कृषि विज्ञान केंद्राचा प्रशिक्षण कार्यक्रम एक आढावा या विषयाचे अध्ययन करण्यासाठी दुय्यम आधारसामग्री प्रामुख्याने कृषि विज्ञान केंद्राचे वार्षिक अहवाल, केंद्राच्या विभागातील प्रत्यक्ष दस्तऐवज व सांख्यिकी विवरण पत्राच्या आधारे संकलित करण्यात आलेली आहे.

**जलना कृषि विज्ञान केंद्राचा प्रशिक्षण कार्यक्रम :—**

भारताच्या विकासात लोकसंख्येचा वाढता दबाव अज्ञान व मनुष्यबळाची अकार्यक्षमता हे प्रमुख अडथळे आहेत. शेतकऱ्यांना शिक्षण—प्रशिक्षण देऊन या अडथळयाची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न कृषि विज्ञान केंद्राने मोठया प्रमाणात प्रशिक्षण विषयक कार्यक्रम राबवून केलेला आहे. भारतीय कृषि क्षेत्रात तंत्रज्ञानाचे हस्तांतरण व समिश्रण याचा अभाव मोठा असल्याने शेतमालाची उत्पादकता आला आहे. तसेच स्थानिक पातळीवर तांत्रिक वैज्ञानिक माहीतीचा प्रचार व प्रसार यांचा सुंदर मिलाप आपण करू न शकल्यामुळे शेतीक्षेत्राची प्रगती मंद गतीने आहे. इतर व्यवसायांच्या तुलनेत शेती व्यवसाय हा सामाजिक दर्जा प्राप्त करू शकलेला नाही. कारण या व्यवसायात षिकलेल्या लोकांचा अत्यंत कमी सहभाग दिसून येतो. विकास ही संकल्पना अतिशय व्यापक आहे. केवळ रस्ते, उत्पन्न आणि तांत्रिक बदल हे विकासाचे निकष होऊ शकत नाहीत तर त्यासाठी लोकांच्या मनोवृत्तीत बदल, त्यांच्या कुटुंबामध्ये होणारे बदल आणि शैक्षणिक बदल जे अत्यंत परिणामकारक व नियोजित पध्दतीने केले जातात. शेतकऱ्यांना योग्य पध्दतीने प्रशिक्षण देऊन त्यांच्यात सर्वच

पातळीवर योग्य व परिणामकारक बदल घडवून आणणे अभिप्रेत असते. जेणेकरून देशातील मनुष्यबळ, पैसा व नैसर्गिक साधनसंपत्ती यांचा पर्याप्त वापर केला जाईल. प्रशिक्षणातून शिकणे ही प्रक्रीया आपण शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत घेवून जाणे अपेक्षित असते.

आर्थिक उद्दीष्ट साध्य करण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रशिक्षण कार्यक्रम अत्यंत प्रभावी ठरतो. ज्यामध्ये शेतकरी, मागासवर्गातील लोक, शाळेतून अयोग्य वेळी बाहेर पडलेले तरूण यांचा समावेश होतो. या प्रशिक्षण कार्यक्रमांतून संबंधित घटकांना शेती सुसंगत असे आधुनिक तंत्रज्ञान अवगत करून दिले तर शेतीचा कायापालट सहज शक्य आहे.

जालना कृषि विज्ञान केंद्र जिल्हयात प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून केंद्रात व केंद्राबाहेर अल्प व दीर्घ मुदतीचे प्रशिक्षण वर्ग घेतलेले आहे. शेती व शेती संलग्न व्यवसायाशी निगडीत विविध स्वरूपाचे प्रशिक्षण कार्यक्रम राबविले आहेत. कृषि विज्ञान केंद्राने हा कार्यक्रम मार्च 1993 पासून सुरू केलेला आहे. त्यात खंड न पडता सप्टेंबर 2007 पर्यंत एकूण 1991 प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे 38054 प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. हे प्रशिक्षण प्रामुख्याने शेतकरी, महिला शेतकरी, ग्रामीण युवक व युवती, मागासवर्गातील लोक, कृषि विस्तार सेवेतील कर्मचारी यांना दिलेले आहे. कृषि विज्ञान केंद्राने हा कार्यक्रम जालना जिल्हयात अतिशय प्रभावीपणे राबविला आहे. या कार्यक्रमामुळे कृषि विज्ञान केंद्राने स्वतःची आगळी वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्याचाच परिणाम म्हणून शेतकरी व महिला शेतकरी यांचा उस्फूर्त प्रतिसाद प्रशिक्षण कार्यक्रमास असतो.

कृषि विज्ञान केंद्राने प्रशिक्षण प्रामुख्याने पीक उत्पादन, पीक संरक्षण, फळबाग लागवड व व्यवस्थापन, फळरोपवाटिका, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, गृहविज्ञान, शेतमाल प्रक्रीया उद्योग, रेशीम उद्योग, गांडूळ खतनिर्मिती उद्योग, सेंद्रिय शेती, एकात्मिक किड व्यवस्थापन, काढणीपश्चात तंत्रज्ञान, पाणलोटक्षेत्र व्यवस्थापन, शेतीत अत्याधुनिक अवजारांचा वापर, अल्प श्रम आधारीत तंत्रज्ञान आदी विषयावर प्रशिक्षण दिलेले आहे.

या प्रशिक्षणामुळे शेतकऱ्यांना शेतीचे नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात झालेले आहे. त्याचा परिणाम म्हणून शेती विकासासाठी या तंत्रज्ञानाचा प्रत्यक्षात शेतकरी प्रयोग करू लागले आहेत. शेतकऱ्यांची शेतीवरील निष्ठा, प्रेरणा, आत्मविश्वास वाढलेला आहे. प्रत्येक पिकांच्या लागवडीपश्चात तंत्रज्ञान त्यांच्यात विकसित झालेले आहे. त्याचा परिणाम म्हणून शेतीची प्रति एकरी उत्पादकता वाढली, खर्च कमी झाला, निव्वळ नफा वाढला आहे, परंतू सोबतच शेतकऱ्यांच्या ज्ञानात, कुषलतेत, उपक्रमशीलतेत, सृजनशीलतेत व मनोवृत्तीत देखील लक्षवेधी बदल झालेला आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाची आगळीवेगळी ओळख म्हणजे महिला शेतकरी दुग्धव्यवसाय, रेशीम व्यवसाय, फळ प्रक्रीया व्यवसाय यासारख्या शेतीपूरक व्यवसायात निपूण झाल्या आहेत. शेतीला पर्यायी उत्पन्नाचा

महत्वपूर्ण स्त्रोत त्यांनी आत्मविष्वासाने उभा केलेला आहे. आज शेतीक्षेत्रात प्रचंड प्रतिकूलता असतांनी देखील त्यांनी यांवर मात केलेली आहे. ही दृश्य शक्ती केवळ कृषि विज्ञान केंद्राच्या प्रशिक्षण कार्यक्रमाची आहे.

तक्ता क्मांक 1.1

जालना कृषि विज्ञान केंद्राने राबविलेले प्रशिक्षण कार्यक्रम (सन 1993–94 ते 2006–07)

| अ. क. | विषय | प्रशिक्षण कार्यक्रम संख्या | लाभार्थी शेतकरी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पुरूष | महिला | एकूण |
| अ. | शेतकरी | | | | |
| 1. | पीक उत्पादन | 202 | 5391 | 344 | 5735 |
| 2. | पीक संरक्षण | 145 | 6029 | 630 | 6659 |
| 3. | उद्यानविद्या | 155 | 3748 | 491 | 4239 |
| 4. | पशुसंवर्धन | 69 | 1693 | 223 | 1916 |
| 5. | कृषि अभियांत्रिकी | 109 | 3883 | 162 | 4045 |
| 6. | गृहविज्ञान | 117 | 369 | 3466 | 3835 |
| 7. | अन्न तंत्रज्ञान | 18 | 110 | 470 | 580 |
| 8. | रेशीम उद्योग | 39 | 823 | 49 | 872 |
| | एकूण (अ) | 853 | 22046 | 5835 | 27881 |
| ब. | ग्रामीण युवक | | | | |
| 1. | पीक उत्पादन | 22 | 422 | 15 | 437 |
| 2. | पीक संरक्षण | 15 | 498 | 19 | 517 |
| 3. | उद्यानविद्या | 51 | 914 | 176 | 1090 |
| 4. | पशुसंवर्धन | 47 | 556 | 03 | 559 |
| 5. | कृषि अभियांत्रिकी | 20 | 526 | 122 | 648 |
| 6. | गृहविज्ञान | 26 | 00 | 860 | 860 |
| 7. | अन्न तंत्रज्ञान | 17 | 170 | 239 | 409 |
| 8. | रेशीम उद्योग | 11 | 184 | 00 | 184 |
| | एकूण (ब) | 209 | 3270 | 1434 | 4704 |
| क. | कृषि विस्तार अधिकारी | | | | |
| 1. | पीक उत्पादन | 19 | 1233 | 42 | 1275 |
| 2. | पीक संरक्षण | 11 | 598 | 02 | 600 |
| 3. | उद्यानविद्या | 18 | 908 | 89 | 917 |
| 4. | पशुसंवर्धन | 4 | 233 | 00 | 233 |
| 5. | कृषि अभियांत्रिकी | 47 | 1552 | 78 | 1630 |
| 6. | गृहविज्ञान | 21 | 412 | 72 | 484 |
| 7. | अन्न तंत्रज्ञान | 05 | 161 | 00 | 161 |
| 8. | रेशीम उद्योग | 04 | 89 | 00 | 89 |
| | एकूण (क) | 129 | 5186 | 283 | 5469 |
| | एकूण (अ़बक) | 1191 | 30502 | 7552 | 38054 |

स्त्रोत : कृषि विज्ञान केंद्राचे वार्षिक अहवाल

तक्ता क्र. 1.1 मध्ये कृषि विज्ञान केंद्राच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा संपूर्ण तपशील दर्शविला आहे. कृषि विज्ञान केंद्राने मार्च 1993 ते सप्टेंबर 2007 पर्यंत शेतकरी, ग्रामीण युवक व कृषि विस्तार सेवेतील कर्मचारी अशा एकूण 38054 प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण दिल्याचे दिसून येते. त्यामध्ये 30502 (80.15ः) एवढे पुरूष तर 7752 (19.85%) एवढया महिला आहेत.

मार्च 1993 ते सप्टेंबर 2007 पर्यंत शेतकरी, ग्रामीण युवक व कृषि विस्तारसेवेतील कर्मचारी असे एकूण 38054 एवढे प्रशिक्षणार्थी आहेत. त्यापैकी शेतकरी 27881 (73.27%) एवढे आहेत. ग्रामीण युवक 4704 (12.36%) आणि कृषि विस्तार सेवेतील कर्मचारी 5469 (14.37%) एवढे आहेत. यावरून असे लक्षात येते की, प्रशिक्षणार्थीमध्ये शेतक-यांचे प्रमाण (73.27%) हे सर्वाधिक आहे तर ग्रामीण युवकांचे प्रमाण तुलनेत (12.36%) हे सर्वात कमी दिसून येते.

27881 या एकूण प्रशिक्षित शेतक-यांपैकी 22046 (79.07%) एवढे पुरूष आहेत तर 5835 (20.93%) एवढया महिला आहेत. 27881 या एकूण प्रशिक्षित शेतक-यांपैकी विषयनिहाय प्रमाण शोधले असता पीक उत्पादन 20.57 प्रतिशत, पीक संरक्षण 23.88 प्रतिशत, उद्यानविद्या 15.21 प्रतिशत, पशुसंवर्धन 6.87 प्रतिशत, कृषि अभियांत्रिकी 14.52 प्रतिशत, गृहविज्ञान 13.75 प्रतिशत, अन्नतंत्रज्ञान 2.08 प्रतिशत असल्याचे दिसून येते. यावरून असे लक्षात येते की, पीक उत्पादन, पीक संरक्षण या विषयातील प्रशिक्षित शेतकरी सर्वात कमी आहेत. अन्नतंत्रज्ञान या विषयातील प्रशिक्षणार्थी कमी असण्याचे कारण म्हणजे कृषि विज्ञान केंद्रात हा विभाग सन 2003—04 मध्ये स्वतंत्र विभाग म्हणून नव्याने सुरू करण्यात आला आहे.

4704 या एकूण ग्रामीण युवक प्रषिक्षणार्थीमध्ये युवक 3270 (69.52%) व युवती 1434 (30. 48%) एवढया आहेत. या एकूण ग्रामीण प्रशिक्षित युवकांचे विषयनिहाय प्रमाण शोधले असता पीक उत्पादन 9.29 प्रतिशत, पीक संरक्षण 10.99 प्रतिशत, उद्यानविद्या 23.17 प्रतिशत, पशुसंवर्धन 11.88 प्रतिशत, कृषि अभियांत्रिकी 13.78 प्रतिशत, गृहविज्ञान 18.28 प्रतिशत, अन्नतंत्रज्ञान 8.69 प्रतिशत असल्याचे दिसून येते. यावरून असे लक्षात येते की, ग्रामीण युवकांमध्ये उद्यानविद्या या विषयातील प्रशिक्षणार्थी सर्वाधिक आहेत तर अन्न तंत्रज्ञान या विषयातील सर्वात कमी प्रशिक्षणार्थी आहेत. परंतू हा स्वतंत्र विभाग 2003—04 मध्ये सुरू झालेला असतांना ही या विभागाने अल्प कालावधीत ग्रामीण युवक व युवतींना अधिक प्रशिक्षण दिले आहे. याचा परिणाम म्हणून ग्रामीण युवकांना स्वतःचे फळप्रक्रीया व्यवसाय सुरू केलेले आहेत.

कृषि विस्तार सेवेतील प्रशिक्षित कर्मचारी एकूण 5469 एवढे आहेत. त्यात 5186 (94.83%) पुरूष आहेत तर 283 (5.17%) एवढया महिला आहेत. यावरून असे लक्षात येते की, कृषि विस्तार सेवेतील प्रशिक्षित कर्मचाऱ्यांमध्ये महिलांचे प्रमाण 5.17 प्रतिशत म्हणजे खूप कमी असल्याचे दिसून येते.

## संदर्भ सूची

1) बोरा ललीता .. फळ व भाजीपाला प्रक्रीया उद्योग हार्ट ॲग्रो टेक इंस्टिटयूट, 860 नवा बुधवार पेठ, पुणे, 2005

2) भोंगळे सुधीर 'विकासवाटा' सुजान प्रकाशन, पुणे, 2005

4) कृषि विज्ञान केंद्राचे वार्षिक अहवाल (सन 1993–94 ते 2006–

5)कृषि विज्ञान केंद्राचे प्रत्यक्ष दस्तऐवज व सांख्यिकी विवरण पत्रे